पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

---

# वार्तापत्र

दिनांक: १०/०८/२०२०

# टिपागड दलम डिव्हीसीएम यशवंत बोगा यास पत्नीसह अटक

- **ऐतिहासिक कामगिरीची नोंद करत सन- २०१९-२० सालामध्ये गडचिरोली पोलीस दलाने मोडले वरिष्ठ नक्षलवादी कॅडरचे कंबरडे**
- **गेल्या दोन वर्षात २ डिकेएसझेडसी, ८ डिव्हीसी, ४ दलम कमांडर, ३ दलम उपकमांडर यांच्या आवळल्या मुसक्या.**
- **मा. पोलीस महासंचालक सा़ो. श्री. सुबोधकुमार जायसवाल यांच्याकडून गडचिरोली पोलीस दलाचे अभिनंदन.**

गडचिरोली पोलीस दलाच्या नक्षलविरोधी अभियानास आज मोठे यश मिळाले असुन, गडचिरोली पोलीस दलाने जहाल वरिष्ठ नक्षलवादी व टिपागड दलमचा डिव्हीसीएम यशवंत ऊर्फ दयाराम अंकलु बोगा वय ३५ वर्ष यास त्याची पत्नी व जहाल नक्षली टिपागड दलम सदस्य शारदा ऊर्फ सुमित्रा पितुराम नैताम वय ३२ वर्ष यांना आज अटक करण्यात यश प्राप्त केले.

जहाल नक्षली यशवंत बोगा हा सन २००९ मध्ये टिपागड दलममध्ये भरती होवुन नक्षलमध्ये दाखल झाला होता. सद्या तो टिपागड दलमच्या डिव्हीसीएम पदावर कार्यरत होता. त्याचेवर गडचिरोली पोलीस दलाच्या विविध पोलीस स्टेशनला ७८ गंभीर गुन्ह्यांची नोंद असुन, यामध्ये सहा पोलीसांसह १८ खुनांच्या तर १० जाळपोळीच्या गुन्ह्यांचा समावेश आहे. हत्तीगोटा, मरकेगाव यांसह सन- २०१९ मध्ये दादापूर येथे वाहन जाळपोळ करण्यात तसेच दि. ०१ मे २०१९ रोजी जांभुळखेडा येथे घडवुन आणलेल्या भुसुरुंग स्फोटात त्याचा मुख्य सहभाग होता. त्याचबरोबर एकुण ३५ पोलीस-नक्षल चकमकीत त्याचा सहभाग होता. शासनाने त्याचेवर एकुण १६ लक्ष रुपयांचे पारितोषिक जाहीर केले होते. तर त्याची पत्नी नामे शारदा नैताम हिच्यावर गडचिरोली पोलीस दलाच्या विविध पोलीस स्टेशनला एकुण ४७ गंभीर गुन्ह्यांची नोंद असुन, शासनाने तिचेवर एकुण २ लक्ष रुपयांचे पारितोषिक जाहीर केले होते.

गडचिरोली पोलीस दलाने सन २०१९-२० मध्ये ऐतिहासिक व उत्तुंग कामगिरीची नोंद करत नक्षलवाद्यांच्या वरिष्ठ कॅडरला लक्ष्य केलेले असुन, गेल्या ०२ वर्षात गडचिरोली पोलीस दलाने ०२ डिकेएसझेडसी मेंबर, ०८ डिव्हीसीएम, ०४ दलम कमांडर व ०३ दलम उपकमांडर यांना अटक, ठार किंवा त्याचे आत्मसमर्पण करण्यात गडचिरोली पोलीस दल यशस्वी झाले आहे.

गडचिरोली पोलीस दलाच्या या कामगिरीमुळे गडचिरोली जिल्ह्यातील वरिष्ठ नक्षलवादी कॅडर नेस्तनाबुत करण्यात यश मिळाले आहे. गडचिरोली पोलीस दलाचे सातत्यपुर्ण यशस्वी नक्षलविरोधी अभियान, अतिदुर्गम भागातील सामान्य आदिवासी बांधवांसाठी गडचिरोली पोलीस दलातर्फे राबविल्या जाणारे विविध कल्याणकारी उपक्रम व गडचिरोली पोलीस दलाने सामान्य आदिवासी बांधवांचा विश्वास संपादन करण्यात मिळविलेले यश यामुळे गडचिरोली पोलीस दल सातत्यपुर्ण यशस्वी कामगिरीची नोंद करत आहे. त्याचबरोबर तरुण- तरुणींची नक्षलमध्ये होणारी भरती शुन्यावर आणण्यात गडचिरोली पोलीस दलाने यश प्राप्त केले आहे.

मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सो. यांनी नक्षलवाद्यांना आत्मसमर्पण करण्याचे आवाहन करत जिल्ह्याच्या विकासाच्या आड येणाऱ्या नक्षलवाद्यांना चोख प्रत्युत्तर देण्यात गडचिरोली पोलीस दल सक्षम असल्याचे म्हटले आहे. टिपागड दलमचा जहाल नक्षली डिव्हीसीएम यशवंत बोगा यास पत्नीसह अटक करणाऱ्या संपुर्ण टीमचे कौतुक करत अभिनंदन केले असुन संपुर्ण टीमला रोख पारितोषिक जाहीर केले आहे.

मा. पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र श्री. महादेव तांबडे साो. यांनी गडचिरोली पोलीस दलाच्या सातत्यपुर्ण यशस्वीपुर्ण कामगिरीचे कौतुक करत संपुर्ण गडचिरोली पोलीस दलाचे अभिनंदन केले आहे.



yashawant boga



sharda@gunni pituram naitam



sharda@gunni pituram naitam